नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १२२ Issue - 122 | वार शुक्रवार दि. १९ सप्टेंबर २०२५ Blow- Friday Date 19 September 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मराठा आरक्षणाच्या जीआर विरोधातील याचिका फेटाळली

## हैदराबाद गॅझेटियरनुसार आरक्षण देण्याबाबतच्या दोन्ही याचिका फेटाळल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मराठ्यांना हैदराबाद गॅझेटियरनुसार आरक्षण देण्याबाबतच्या सरकारच्या जीआरला मुंबई हायकोर्टात आव्हान देण्यात आलं होतं. याबाबतच्या निर्णयाविरोधात हायकोर्टात जीआरला विरोध करणारी जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. वकील विनित धोत्रे यांनी ही याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज हायकोर्टात दोन सत्रात सुनावणी पार पडली. हायकोर्टाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतला. यानंतर हायकोर्टाने विनित धोत्रे यांची याचिका ग्राह्य धरण्याजोगी नाही, असं म्हणत याचिका फेटाळली. त्यामुळे मराठा समाजासाठी हा सर्वात मोठा दिलासा मानला जात आहे.



याचिकाकर्त्याने जनहित याचिका दाखल केली आहे. पण या याचिकेमधील मुद्दे आणि मागणी पाहता व्यापक जनहित दिसत नाही. त्यांना जीआरवर आक्षेप असेल तर त्यांनी स्वत:ची वैयक्तिक रिट याचिका दाखल करावी, असं म्हणत मुंबई हायकोर्टाने ही याचिका फेटाळली. पण यावेळी मुंबई हायकोर्टाने एक महत्त्वाची मुभादेखील दिली आहे. याचिकाकर्त्यांनी वरच्या न्यायालयात जावं किंवा जीआरविरोधात इतर रिट याचिका ज्या दाखल करण्यात आल्या आहेत त्या इंटरलिंक करण्याची मुभा कोर्टाने दिली आहे.

सरकारकडून महाधिवक्ता बीरेंद्र सराफ यांनी मुंबई हायकोर्टात युक्तिवाद केला. शासन निर्णयाने शेड्यूल कास्टमधील कुणीही बाधित नाही, अशी माहिती महाधिवक्तांनी कोर्टात दिली. त्यानंतर हायकोर्टाने याचिकाकर्त्यांना महत्त्वाचा सवाल केला. या जीआरमुळे याचिकाकर्ते बाधित कसे? असा प्रश्न हायकोर्टाने विचारला. तसेच जनहित याचिका ग्राह्य धरण्यास पात्र नाही, असं हायकोर्टाने स्पष्ट केलं. तसेच जनहित याचिकेच्या माध्यमातून प्रत्येक गोष्टीला आव्हान दिलं जाऊ शकत नाही, असंही हायकोर्ट म्हणालं.

मराठा आरक्षणाचा नवा जीआर लागू झाल्यानंतर ओबीसी समाजातील नेते मंडळी आणि अभ्यासकांमध्ये नाराजीचा सूर बघायला मिळाला. अनेक ओबीसी नेते नाराज झाले. त्यांनी हायकोर्टात जाण्याची तयारी केली. अनेकांनी हैदराबाद गॅझेटियरच्या नव्या जीआरला कोर्टात आव्हान देणाऱ्या याचिका दाखल केल्या आहेत. त्यापैकी पहिली याचिका वकील विनित धोत्रे यांनी दाखल केली होती. यानंतर अनेकांनी याचिका दाखल केल्या आहेत. हायकोर्टाने पहिल्या जनहित याचिकेवर आज सुनावणी घेत ती याचिका फेटाळून लावली आहे. पण मराठा आरक्षणाच्या नव्या जीआरला विरोध करणाऱ्या इतर याचिंकांबाबत हायकोर्ट काय निर्णय घेणार? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

# निवडणूक आयोग मतचोरांना पाठीशी घालतंय : राहुल गांधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज केंद्रीय निवडणूक आयोगावर पुन्हा आरोपांची तोफ डागली. मतदार याद्यांमधून जाणीवपूर्वक हजारो मतदारांची नावं वगळली गेल्याचं राहुल गांधींनी पत्रकार परिषदेत म्हटलंय. त्यासाठी त्यांनी पुरावेही सादर केले.

एकाच नंबरावरून अनेक डिलिशनचे अर्ज भरले गेले. मात्र जे नंबर यासाठी वापरले त्यांच्या मालकांना याचा पत्ताच नव्हता असा आरोप राहुल गांधी यांनी केला. अल्पसंख्य, दलित, मागासवर्गातील नावं जाणीवपूर्वक वगळली, काँग्रेस समर्थकांची नावं शोधून काढून वगळली गेली असं राहुल गांधी यांनी म्हटलं. त्यासाठी मध्यवर्ती कॉल सेंटरचा वापर केला गेला असा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केला.

### मतचोरीचे आरोप चुकीचे आणि निराधार, निवडणूक आयोगाचे सोशल मीडियातून उत्तर

केंद्रीय निवडणूक आयोगाने ८ दिवसांत डेस्टिनेशन आयपी अ‍ॅड्रेस, ओटीपी ट्रेल द्यावे अशी मागणी राहुल गांधी यांनी केली. कर्नाटकातील सीआयडीने यासंबंधी चौकशी केली आणि निवडणूक आयोगाकडून माहिती मागवण्यासाठी पत्र लिहिलं. अशी एकूण १८ पत्रे त्यांनी निवडणूक आयोगाला लिहिली. तरीही निवडणूक आयोगाने एका शब्दानेही त्याला उत्तर दिलं नाही. आता आठ दिवसांत ही माहिती दिली नाही तर केंद्रीय निवडणूक आयोग मतचोरांना, लोकशाहीची हत्या करणाऱ्यांना पाठीशी घालत आहेत असं देशातले युवा समजतील असं ते म्हणाले.

मतचोरीवरून राहुल गांधींनी केलेल्या आरोपांवर आता निवडणूक आयोगाने सोशल मीडिया पोस्टच्या माध्यमातून उत्तर दिलं आहे. राहुल गांधींनी केलेले आरोप हे चुकीचे आणि निराधार असल्याचं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. मतदाराचे नाव वगळण्यापूर्वी संबंधिताला त्याचं म्हणणं मांडण्याची संधी दिली जाते असंही स्पष्टीकरण आयोगाकडून देण्यात आलं.

लोकसभा निवडणुकीच्या आधी अनेक मतदारांची नावे वगळण्यात आली असा आरोप राहुल गांधींनी केला. त्यासाठी त्यांनी कर्नाटकातील आळंद मतदारसंघाचे उदाहरण दिले. त्याचपद्धतीने महाराष्ट्रातील राजुरी मतदारसंघाचेही उदाहरण दिले. निवडणूक आयोगाने मतचोरांना आणि लोकशाही संपवणाऱ्यांना पाठीशी घातल्याचा आरोपही राहुल गांधींनी केला.

राहुल गांधींनी केलेल्या आरोपांवर निवडणूक आयोगाने सोशल मीडियाच्या माध्यमातून उत्तर दिलं आहे. निवडणूक आयोगाने म्हटलंय की, कोणतीही सामान्य व्यक्ती ऑनलाइन पद्धतीनं नाव हटवू शकत नाही. नाव हटवण्यापूर्वी संबंधित आयोगाकडून मतदाराला म्हणणे मांडण्याची संधी दिली जाते. २०२३ मध्ये आळंदमध्ये नावं हटवण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला. त्यावेळी आम्ही एफआयआरही दाखल केला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांवरील आरोप निराधार आणि अयोग्य आहेत.

# मधुभाई कुलकर्णी यांचं निधन, संघाचा जेष्ठ प्रसारक हरपला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक मधूभाई कुलकर्णी यांचे आज, गुरुवारी १८ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता वृद्धपकाळामुळे छत्रपती संभाजीनगर येथे निधन झाले. मृत्यूसमयी ते ८८ वर्षांचे होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना राजकीय क्षेत्रात आणण्यात मधूभाईंचा सिंहाचा वाटा होता.

दोन आठवड्यांपूर्वीच सरसंघचालक डॉ. मोहन भागवत डॉ. हेडगेवार रुग्णालयात भेटीस गेले आणि मधुभाई कुलकर्णी यांची प्रकृती विचारपूस केली होती. मधुभाईंना १९८५ मध्ये गुजरातमध्ये प्रांत प्रचारक म्हणून नेण्यात आले होते. त्या काळात त्यांनी संघ प्रचारक असलेल्या नरेंद्र मोदींना भाजपमध्ये सक्रिय केले. यानंतर नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री झाले आणि पुढे भारताचे पंतप्रधान झाले.

मधूभाई कुलकर्णी यांचा जन्म १७ मे १९३८ रोजी कोल्हापूर येथे झाला होता. त्यांचे शालेय शिक्षण चिकोडी येथे झाले होते. चिकोडी येथे वास्तव्य करत असताना ते संघाच्या शाखेत जाऊ लागले. संघाच्या स्थापनेपासून आजतागायत सुरू असलेल्या शतकी वाटचालीचे ते साक्षीदार होते. कोल्हापुरातून १९५४ मध्ये इयत्ता दहावीची परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर मधूभाई महाविद्यालयीन शिक्षणासाठी मुंबईला गेले. बीए आणि बीएड्.चे शिक्षण घेतल्यानंतर काही काळ त्यांनी सेल्स टॅक्स विभागात नोकरी केली. त्यानंतर त्यांनी संघाचे प्रचारक म्हणून काम करण्याचा निर्णय घेतला.



महाराष्ट्राच्या जळगाव येथून तालुका प्रचारक म्हणून त्यांनी १९६२ मध्ये कार्य सुरु केले. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हा प्रचारक, सोलापूरचे विभाग प्रचारक, पुण्याचे महानगर प्रचारक म्हणून त्यांच्याकडे दायित्व होते. १९८४ ते १९९६ या कालखंडात ते गुजरातचे प्रांत प्रचारक होते. १९९६ ते २००३ या काळात त्यांनी पश्चिम क्षेत्राचे प्रचारक म्हणून काम केले. तसेच २००३ ते २००९ या काळात ते संघाचे अखिल भारतीय बौद्धिक प्रमुख होते. या काळात त्यांचे वास्तव्य तत्कालीन आंध्रप्रदेशच्या हैदराबाद येथे होते. वयोमानामुळे २०१५ पासून ते दायित्वमुक्त होऊन छत्रपती संभाजीनगर येथे वास्तव्याला होते. अलिकडे प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सरसंघचालक मोहन भागवत यांनी २ आठवड्यापूर्वीच त्यांची प्रत्यक्ष भेट घेत प्रकृतीची चौकशी केली होती. परंतु, आज, गुरुवारी त्यांची प्राणज्योत मालवली. दरम्यान, मधूभाईंचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी समर्पण कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे ठेवण्यात आले आहे. त्यांनी देहदान केले आहे. त्यांचे पार्थिव रामचंद्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, आर के दमाणी मेडिकल कॉलेज येथे सोपविले जाणार आहे.

# सूक्ष्म, लघु उद्योगांसाठी जमीन अकृषक परवाना अट काढावी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सूक्ष्म आणि लघु उद्योग, अन्नप्रक्रिया उद्योग यासाठी जमिनीच्या काही मर्यादेत अकृषक परवान्याची अट काढण्याचा निर्णय सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित धोरणात्मक सुधारणा (पॉलिसी रिफॉर्म) बैठकीत घेण्यात आला. या निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सूक्ष्म आणि लघु उद्योगांना अकृषक परवाना मिळण्यासाठी लागणाऱ्या वेळेची बचत होऊन त्यांना वेळेत उद्योग सुरू करणे सोयीचे होणार आहे.

राज्याची सर्वच क्षेत्रात प्रगती करण्यासाठी शासन विविध धोरणांची अंमलबजावणी करीत असते. या धोरणांमध्ये भविष्यातील आव्हानांचा वेध घेत व्यापक समाजहित असणे गरजेचे आहे. सामान्य नागरिकाचे जीवन अधिकाधिक सुसह्य करण्यासाठी या धोरणांचा उपयोग व्हावा, अशी अपेक्षा यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली. राज्याला देशामध्ये अन्य राज्यांच्या तुलनेत पुढे नेणारी बरीचशी क्षेत्र दुर्लक्षित राहिली होती. या क्षेत्रांच्या विकासातून समृद्ध राज्य बनविण्यासाठी अशा क्षेत्रावर आधारित धोरणांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. ही सर्व धोरणे राज्याच्या विकास आणि समाज हितासाठी समर्पित असतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात मोठ्या औद्योगिक वसाहतींच्या ठिकाणी ‘ इंडस्ट्रियल टाऊनशिप’ उभारण्यात याव्यात. उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मनुष्यबळासाठी ही महत्त्वाची ठरणार आहे. उद्योगाच्या आजूबाजूलाच निवासाची सुविधा मिळाल्यास कामगारांची कार्यक्षमता वाढेल. या टाऊनशिपमध्ये संपूर्ण नागरी सुविधा देण्यात याव्यात. शहरात, गावात मिळणाऱ्या नागरी सुविधा त्यांना मिळतील, याची व्यवस्था करावी. कर्करोगासारख्या दुर्धर आजारांवरील उपचारामुळे बरे झाल्यावर दिसणारी लक्षणे आणि वेदना कमी करण्यासाठी ‘पॅलॅटिव्ह केअर पॉलिसी’ अंतर्गत आवश्यक नियंत्रक प्रणाली उभारावी. तिसऱ्या आणि चौथ्या टप्प्यातील कर्करोगामध्ये ‘ पॅलॅटिव्ह केअर’ खूप महत्त्वाचे आहे. लक्षणे आणि वेदना कमी करणारी औषधे वापराबाबत आणि उपलब्धतेसाठी धोरण बनवावे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, काही उद्योगांमध्ये ‘कॅप्टिव्ह पॉवर जनरेशन’ करावे लागणार आहे. त्यामुळे स्पर्धात्मक वीज दर तयार होऊन त्यामधून वीज ग्राहकांना लाभ होईल. तसेच उद्योगांनाही वीज मिळेल. उद्योग घटकांतील कामगारांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम नियमितपणे घेऊन त्यांची कौशल्य वृद्धी करावी. अन्य शिष्यवृत्तीच्या योजनांच्या धर्तीवर उद्योगात काम करणाऱ्या कामगारांसाठी शिष्यवृत्ती योजना आणावी. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना शासनाकडून अदा करण्यात येणाऱ्या देयकांसाठी ऑनलाईन पोर्टल तयार करावे. त्यासाठी ‘ऑटोमॅटेड सिस्टीम’ असावी. तसेच सेवा पुरवठादाराला त्याच्या देयकाची स्थिती कळावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. अमेरिकेने भारतावर लावलेल्या ५० टक्के आयात शुल्कामुळे राज्यातून अमेरिकेला होत असलेल्या निर्यातीचे नुकसान भरून काढण्यासाठी नवनवीन संकल्पना अमलात आणाव्यात. अन्य बाजारपेठांचा शोध घेत पर्याय शोधावे. सागवान लाकडाची देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी सागवानची लागवड वाढविण्यात यावी. वन विभागाने यासंदर्भात आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

### आरक्षण हा गरिबी हटवण्याचा कार्यक्रम नाही

### हायकोर्टाच्या निकालावर छगन भुजबळ यांची प्रतिक्रिया

# एकतर हा जीआर मागे घ्या किंवा आवश्यक सुधारणा करा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : मराठा समाजाला हैदराबाद गॅझेटियरनुसार कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या नव्या जीआर विरोधात दाखल जनहित याचिका मुंबई हायकोर्टाने आज फेटाळली. यानंतर मंत्री छगन भुजबळ यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. नागपूरमध्ये आज समता परिषदेचा कार्यकर्ता संवाद मेळावा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात छगन भुजबळ यांनी भाषण करताना आपली भूमिका मांडली. हा जीआर निघाल्यानंतर अनेकांनी आपापल्या पद्धतीने हायकोर्टात धाव घेतली. आतापर्यंत आम्ही चार ते पाच रिट याचिका दाखल केल्या आहेत. एक कुणबी सेनेच्या वतीने केलं आहे. दुसरं नाभिक समाजाच्या वतीने, तिसरं माळी महासंघाच्या वतीने केलं आहे.

चौथी समता परिषदेचे आमचे मुंडलिक म्हणून अधिकारी आहेत त्यांच्या वतीने केलं आहे. अशा रिट याचिका आम्ही दाखल केल्या आहेत. त्याची सुनावणी सुरु होईल. अतिशय काळजीपूर्वक सुनावणी होईल. काळजीपूर्वक वकील नेमले आहेत. मला खात्री आहे, निश्चितपणे आपली मागणी मान्य होईल. आपली मागणी आहे, एकतर हा जीआर मागे घ्या किंवा आवश्यक सुधारणा त्या जीआरमध्ये करा, ही आपली मागणी आहे. त्यामध्ये मला वाटतं की, निश्चितपणे यश मिळेल, असा मोठा दावा छगन भुजबळ यांनी केला.

याबाबत इतिहास माहिती असायला पाहिजे म्हणून सांगतो. मंडळ आयोगाच्या अगोदर वेगवेगळ्या राज्यांनी आपापल्यापरिने वेगवेगळ्या समाजांना आरक्षण दिलं. त्यावेळी बी बी देशमुख कमिटी फार वर्षापूर्वी नेमली. मराठा समाजाला आरक्षण द्यायचं की नाही? त्यांनी सुद्धा सांगितलं की, आरक्षण देता येणार नाही.

संविधानात ३४० कलम आहे, बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटलं आहे की, ओबीसी समाजात देशात हजारो जाती आहेत. आपल्या राज्यात ३७५ जाती आहेत. हा समाज अतिशय गरिब, अडचणीचा आहे. त्यांची माहिती गोळा करा, आयोग निर्माण करा आणि त्यांना आरक्षण द्यायला पाहिजे. कलम ३४१ मध्ये दलित समाजाला आरक्षण द्या म्हणून सांगितलं आहे आणि कलम ३४२ मध्ये आदिवासी समाजाला आरक्षण द्या म्हणून सांगितलं आहे.

दीड-दोन वर्ष झाल्यानंतरही भारत सरकारने आयोग नेमला नाही म्हणून बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत सरकारचा जो राजीनामा दिला त्यामध्ये तीन-चार कारणे दिली, त्यामध्ये एक प्रमुख कारण होतं की, मी सांगून सुद्धा या गरिब समाजासाठी आयोग नेमला गेला नाही. मग कालेलकर आयोग नेमला गेला. कालेलकर आयोगाने सांगितलं की, हो ह्यांना मदत केली पाहिजे. त्या आयोगाचा अहवाल राष्ट्रपतींपर्यंत गेला. तसेच मंत्रिमंडळात गेला.

तो अहवाल गेल्यानंतर कालेलकर यांना सांगण्यात आलं की, तुम्ही असं का केलं? चुकीचं गेलं. अखेर कालेलकर यांनी स्वतंत्र पत्र लिहिलं की, हे जरी असं असलं तरी मला स्वत:ला वाटतं की आरक्षण देऊ नये. लढा तेव्हापासून सुरु आहे आणि मग मंडल आयोग सुरु झाला. मंडल आयोगाचा अहवाल आला. १० वर्ष तो अहवाल दाबून ठेवण्यात आला. पण ज्यावेळेला वी. पी. सिंह पंतप्रधान होते त्यांनी तो अहवाल बाहेर काढला आणि ओबीसींना आरक्षण देत असल्याचं जाहीर केलं.

मी त्यावेळी या निर्णयाचं स्वागत केलं होतं. त्यावेळी वर्तमान पत्र छापून आलं. त्यावेळी मी शिवसेनेत होतो. त्या भूमिकेमुळे बाळासाहेब ठाकरे आणि आमचे मतभेद व्हायला सुरुवात झाली. त्यांचं म्हणणं होतं की, आर्थिक विषयावर आरक्षण दिलं पाहिजे. पण आरक्षणाचा ढाचा हा आर्थिक विषयावर नाही. तो सामाजिक मागासलेपणावर आहे. पण आरक्षण हा गरिबी हटवण्याचा कार्यक्रम नाही.

## संपादकीय....

### आरोप-प्रत्यारोप

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज केंद्रीय निवडणूक आयोगावर पुन्हा आरोपांची तोफ डागली. मतदार याद्यांमधून जाणीवपूर्वक हजारो मतदारांची नावं वगळली गेल्याचं राहुल गांधींनी पत्रकार परिषदेत म्हटलंय. त्यासाठी त्यांनी पुरावेही सादर केले. एकाच नंबरावरून अनेक डिलिशनचे अर्ज भरले गेले. मात्र जे नंबर यासाठी वापरले त्यांच्या मालकांना याचा पत्ताच नव्हता असा आरोप राहुल गांधी यांनी केला. अल्पसंख्य, दलित, मागासवर्गातील नावं जाणीवपूर्वक वगळली, काँग्रेस समर्थकांची नावं शोधून काढून वगळली गेली असं राहुल गांधी यांनी म्हटलं. त्यासाठी मध्यवर्ती कॉल सेंटरचा वापर केला गेला असा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केला. केंद्रीय निवडणूक आयोगाने ८ दिवसांत डेस्टिनेशन आयपी अ‍ॅड्रेस, ओटीपी ट्रेल द्यावे अशी मागणी राहुल गांधी यांनी केली. कर्नाटकातील सीआयडीने यासंबंधी चौकशी केली आणि निवडणूक आयोगाकडून माहिती मागवण्यासाठी पत्र लिहिलं. अशी एकूण १८ पत्रे त्यांनी निवडणूक आयोगाला लिहिली. तरीही निवडणूक आयोगाने एका शब्दानेही त्याला उत्तर दिलं नाही. आता आठ दिवसांत ही माहिती दिली नाही तर केंद्रीय निवडणूक आयोग मतचोरांना, लोकशाहीची हत्या करणाऱ्यांना पाठीशी घालत आहेत असं देशातले युवा समजतील असं ते म्हणाले. मतचोरीवरून राहुल गांधींनी केलेल्या आरोपांवर आता निवडणूक आयोगाने सोशल मीडिया पोस्टच्या माध्यमातून उत्तर दिलं आहे. राहुल गांधींनी केलेले आरोप हे चुकीचे आणि निराधार असल्याचं निवडणूक आयोगाने म्हटलं आहे. मतदाराचे नाव वगळण्यापूर्वी संबंधिताला त्याचं म्हणणं मांडण्याची संधी दिली जाते असंही स्पष्टीकरण आयोगाकडून देण्यात आलं. लोकसभा निवडणुकीच्या आधी अनेक मतदारांची नावे वगळण्यात आली असा आरोप राहुल गांधींनी केला. त्यासाठी त्यांनी कर्नाटकातील आळंद मतदारसंघाचे उदाहरण दिले. त्याचपद्धतीने महाराष्ट्रातील राजुरी मतदारसंघाचेही उदाहरण दिले. निवडणूक आयोगाने मतचोरांना आणि लोकशाही संपवणाऱ्यांना पाठीशी घातल्याचा आरोपही राहुल गांधींनी केला. राहुल गांधींनी केलेल्या आरोपांवर निवडणूक आयोगाने सोशल मीडियाच्या माध्यमातून उत्तर दिलं आहे. निवडणूक आयोगाने म्हटलंय की, कोणतीही सामान्य व्यक्ती ऑनलाइन पद्धतीनं नाव हटवू शकत नाही. नाव हटवण्यापूर्वी संबंधित आयोगाकडून मतदाराला म्हणणे मांडण्याची संधी दिली जाते. २०२३ मध्ये आळंदमध्ये नावं हटवण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला. त्यावेळी आम्ही एफआयआरही दाखल केला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमारांवरील आरोप निराधार आणि अयोग्य आहेत.

# माढा व श्रीपुर महाळुंग नगरपंचायतीला नमो उद्यानासाठी २ कोटी निधी मंजूर



## आमदार अभिजीत पाटील यांनी मांडले मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री पालकमंत्री यांचे आभार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघातील नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागामार्फत एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाअंतर्गत माढा नगरपंचायतसाठी १ कोटी तसेच श्रीपुर महाळुंग नगरपरिषदेसाठी १ कोटी असा एकूण २ कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर करण्यात आलेला आहे.

या मंजूर निधीतून दोन्ही शहरांमध्ये भव्य, आधुनिक व पर्यावरणपूरक असे नमो उद्यान उभारण्यात येणार असल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

माढा व महाळुंग-श्रीपुर येथे आधुनिक व हिरवाईने नटलेले उद्यान नागरिकांना विश्रांतीसाठी, सकस जीवनशैलीसाठी आणि पर्यावरणपूरक वातावरणासाठी एक सुंदर व सुसज्ज जागा मिळेल. लहान मुलांसाठी खेळाची साधने - लहान मुलांना शारीरिक व मानसिक विकासासाठी विविध खेळणी व उपक्रम उपलब्ध होतील.

**माढा विधानसभा मतदारसंघातील जनतेला सुसज्ज उद्याने, लहान मुलांना खेळणी, जेष्ठ नागरिकांना विसावासाठी नक्कीच फायदा होईल. नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सदैव मी प्रयत्नशील असेल.**

**– आ.अभिजीत पाटील**
**माढा विधानसभा मतदारसंघ**

माढा मतदारसंघांमध्ये भरीव निधी दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे मनःपूर्वक आभार आमदार अभिजीत पाटील यांनी केले.

# बेरोजगारी निर्मूलनासाठी जनतेत जाणीव जागृती केली पाहिजे : बी. बी. मेश्राम



**१३२ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे जनसंपर्क कार्यालय ४, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे कामगारावर गुलामगिरीची बंधने लादणे हे लोकशाहीचे विडंबन होय. करिता शासन यंत्रणेचा ताबा घेणे हे कामगारांचे ध्येय असावे. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ८७ व्या व ८२ व्या वर्धापन दिनानिमित्त या प्रासंगिक विषयावर १३२ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहीक कार्यशाळा १४ सप्टेंबर २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, १५ सप्टेंबर १९३८ ला मुंबई विधिमंडळात ट्रेड डिस्प्युट बिलावर आपले मत व्यक्त करताना सर, रॉबर्ट बेल यांचा ऐतिहासिक संदर्भ देऊन १९३४ प्रमाणे कामगारांची व्यवस्थापना बरोबर केली जाणारी तडजोड सक्तीची केली होती. परंतु परिस्थितीनुरूप ती ऐच्छिक ठेवण्यात आली होती.

तर मग पुन्हा ती सक्तीची का करण्यात येत आहे? कामगारांनी संप करणे म्हणजे नोकरीचे कॉन्ट्रॅक्ट मोडन्यासारखे असल्याने तो फौजदारी गुन्हा ठरत नाही तर दिवाणी गुन्हा होऊ शकेल. ज्यामुळे केवळ नुकसान भरपाई देणे बंधनकारक ठरते. तसेच प्रत्येक मनुष्याला स्वातंत्र्याचा हक्क असेल तर कामगारांना सुद्धा संप करण्याचा हक्क असायला हवा. जे नाकारून काँग्रेस सरकार कामगारावर गुलामगिरी लादू इच्छित होती. म्हणून त्या बिलाला कामगाराचे नागरिक स्वातंत्र्य हिरावून घेणारा कायदा अर्थात कामगारांच्या लोकशाही प्रणित मूलभूत हक्कावर गदा आणली जात असल्याने लोकशाही संपुष्टात येईल. अशा प्रकारे कामगारावर गुलामगिरीची बंधने लादणे हे लोकशाहीचे विडंबन होय. तसेच कामगारांच्या समस्या निर्मुलनासाठी ट्रेड युनियन ला मर्यादा पडत असल्याने कामगारांनी सत्ता स्थानी पोहोचण्याचे ध्येय ठेवले पाहिजे. असे 'द इंडियन फेडरेशन ऑफ लेबर' च्या वतीने आयोजित 'ऑल इंडिया ट्रेड युनियन वर्क्स स्टडी कॅम्प' च्या समारोपपिय सत्रात १७ सप्टेंबर १९४३ ला दिल्ली येथे बाबासाहेबांनी व्यक्त केले होते. करिता वर्तमानात कामगारांच्या समस्याच्या अनुषंगाने बेरोजगारी निर्मूलनासाठी जनतेत जाणीव जागृती केली पाहिजे. उद्घाटन पर मार्गदर्शन करताना अ‍ॅड. राजू बागुल म्हणाले की, समाज जीवनात कामगारांच्या श्रमाची फारशी दखल घेतली जात नाही. ९३ टक्के कामगार असंघटित क्षेत्रात कार्यरत आहेत तर सात टक्के कामगार संघटित क्षेत्रात असले तरी ते विभाजित आहेत. प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना विलास कटारे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांसाठी केलेल्या उपाय योजनांची समाज जीवनात अंमलबजावणी केली पाहिजे. जेणेकरून विषमतावादी जातीव्यवस्थेचा नायनाट होऊ शकेल. याप्रसंगी अशोक मेश्राम म्हणाले की, उद्योगपतीच्या उद्योग धंद्यात वाढ होत असली तरी सामान्य जनतेचे मात्र हाल होत आहेत.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला व पुष्प अर्पण करण्यात आले तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक अ‍ॅड. विलास रामटेके यांनी तर आभार मिलिंद बागुल यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, अ‍ॅड. विलास रामटेके, , उद्योजक मिलिंद बागुल, अशोक मेश्राम, ड. राजू बागुल, विलास कटारे, प्रसेनजीत वाघमारे, साधू आनंद इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

# धाराशिवमध्ये सकल बौद्ध बांधवांचा जिल्हा कचेरीवर जनाक्रोश मोर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड :

बिहार राज्यातील बुद्धगया महाबोधी बुद्ध विहारातील हिंदू पुरोहितांचा कब्जा हटवून त्या ठिकाणी बौद्ध धम्म गुरु भिकूंच्या ताब्यात ते विहार द्यावे या मागणीसाठी धाराशिव येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर जिल्ह्यातील सखल बौद्ध बांधवांच्या वतीने जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

बुद्धगया महाबोधी बुद्ध विहार बौध्दाच्या ताब्यात द्यावे या प्रमुख मागणीसाठी दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयावर भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा धाराशिव च्या वतीने आयोजित या जन अक्रोष मोर्चा मध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले),वंचित बहुजन आघाडी,दलित पँथर सह जिल्ह्यातील विविध पक्ष संस्था संघटना व सखल बौध्द बांधव सहभागी झाले होते.

धाराशिव येथील क्रांती चौकातून या प्रचंड जन आक्रोश मोर्चास सुरुवात झाली झाली. क्रांती चौक ते येथील महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करून तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्याही आश्वरूढ पुतळ्यास अभिवादन करून हा मोर्चा थेट धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला या ठिकाणी या मोर्चाचे जाहीर सभेत रूपांतर झाले.या प्रसंगी भंते सुमंगल यानी उपस्थित मोर्चे करूना त्रिशरण पंचशील दिले. अर्थात सामुदायिकरित्या बुद्ध वंदना घेण्यात आली

यावेळी बोलाताना प्रत्येकानी जोरदार मागणी केली की ज्याप्रमाणे या देशातील हिंदू मंदिरे,हिंदू धर्मगुरुच्या ताब्यात आहेत,मुस्लिम मजिदीमध्ये मुस्लिम धर्मगुरुचा ताबा आहे. ख्रिश्चन मंदिरात (चर्च) ख्रिश्चन धर्मगुरूचा ताबा आहे.

त्याचप्रमाणे या देशातीलच नव्हे तर सबंध जगातील बौद्ध बांधवांचे श्रद्धास्थान असलेल्या बिहार राज्यातील बुद्धगया महाबोधी विहारांमध्ये हिन्दु पुरोहिताचे काय काम? असा खडा सवाल उपस्थित करून बुध्दगया महाबोध्दी बुध्दविहारत बौद्ध धम्मगुरूंचा भिक्खूंचा ताबा असला पाहिजे तेंव्हा सन १९४९ कायदा रद करून या बुद्धगया महाबोधी बुद्ध विहारातील हिंदू पूरोहितांचा ताबा काढून हे विहार पूर्णतःबौद्धांच्या ताब्यात द्या असी मागणी रिपाइं (आठवले)चे प्रदेश जॉइंट सेक्रेटरी राजाभाऊ ओव्हाळ, वंचित बहुजन अघाडीचे जिल्हा अध्यक्ष प्रणित डिकले, सुधीर कांबळे,भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हा अध्यक्षा राजश्रीताई कदम आदींनी या मोर्चाला संबोधित करताना केली. या




सभेचे सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा सरचिटणीस विजय बनसोडे यानी केले तर उपस्थित मान्यवरांचे व सहभागी मोर्चेकरांचे अभार भारतीय बौद्ध महासभेचे माजी जिल्हा अध्यक्ष अँड.दिपक निकाळजे यानी मानले.

यावेळी रिपाइं चे प्रदेश सचिव संजय बनसोडे, वंचित बहुजन महिला अघाडीच्या जिल्हा अध्यक्षा अनुराधा लोखंडे, रिपाइंचे जिल्हा अध्यक्ष विद्यानंद बनसोडे, मिलींद रोकडे, भारतीय बौद्ध महासभेचे राजेंद्र निकाळजे, गुणवंत सोनवने, विश्वास भाऊ पांडागळे, बाळासाहेब बागडे गुरुजी,दादासाहेब बनसोडे, सोमनाथ गायकवाड, बाबासाहेब मस्के,मुन्ना ओव्हाळ,दादासाहेब बनसोडे, एस.के. गायकवाड,सह जिल्हयातील सर्व समता सैनिक दलातील सैनिक, उमरगा, लोहारा, तुळजापूर, धाराशिव, कळंब, भूम, परंडा, वाशी आदी तालूक्यातील बौध्द उपासक, उपाशिका युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एमआयटी विश्वशांती गुरुकुलचे जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत अभूतपूर्व यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेमध्ये वाखरी, पंढरपूर येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपल्या योगासन कलेचा ठसा उमटवत घवघवीत यश संपादन केलेले आहे. येथे झालेल्या जिल्हास्तरीय कलात्मक योगासन जोडी स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलींमध्ये सिद्धी सावंत व दिक्षा जाधव यांनी प्रथम क्रमांक मिळवला असून, पुणे येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी त्या पात्र ठरल्या आहेत.




दुसरीकडे १७ वर्षाखालील मुलींच्या गटात ईश्वरी गाडवे व वाणिश्री घाडगे यांनी द्वितीय क्रमांक, तर १४ वर्षाखालील मुलींमध्ये स्वस्ति मालवदकर व ज्ञानेश्वरी वानवे यांनी देखील या कलात्मक योगासन जोडी स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

या स्पर्धेसाठी क्रीडा शिक्षिका पल्लवी पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विश्वशांती गुरुकुल स्कूलचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी यांनी निरोगी आयुष्यासाठी योगासनाचे महत्त्व अधोरेखित केले. एमआयटी संस्थेच्या वतीने सर्व पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले आणि आगामी विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

## स्वेरीमध्ये 'अभियंता दिन' साजरा व 'ऑलम्पस २ के २५' चे उदघाटन

## दास ऑफशोअर लिमी.चे डॉ. अशोक खाडे

# आपल्या स्वभावातून आपल्या भविष्याला आकार मिळत असतो

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'डॉ. रोंगे सरांच्या प्रत्येक शब्दातून विद्यार्थ्यांबद्दल, संस्थेबद्दल असणारी तळमळ व्यक्त होते. पंढरपूरच्या पवित्र भूमीत आणि स्वेरीच्या एका आदर्श शिक्षण संकुलात शिक्षण घेण्याची संधी मिळाल्यामुळे तुम्ही भाग्यवान आहात. स्वेरीबद्दल मला एक वेगळी आत्मीयता वाटते. आपल्याला आयुष्यात पुढे जायचे असेल तर बऱ्याच बाबींची काळजी घ्यावी लागते. आपल्या स्वभावातूनच आपल्या भविष्याला आकार मिळत असतो.' असे प्रतिपादन दास ऑफशोअर लिमी., मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अशोक खाडे यांनी केले.





गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या १६४ व्या जयंती निमित्त 'अभियंता दिन' आणि 'ऑलम्पस २ के २५' या तांत्रिक स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दास ऑफशोअर लिमी., मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अशोक खाडे हे मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डिजिटेकचे मॅनेजिंग डायरेक्टर अजित गटे हे होते. सर विश्वेश्वरय्या यांची प्रतिमा पूजन, महाराष्ट्र गीत व स्वेरी गीतानंतर संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे हे सर्वांचे स्वागत करून प्रास्ताविकात म्हणाले की, 'स्वेरी हा शिक्षणातील ब्रँड झालेला आहे. आज हजारो विद्यार्थी स्वेरीमध्ये प्रवेश न मिळाल्यामुळे नाराज होऊन परत जात आहेत. स्वेरीच्या नावातच 'एज्युकेशन' हा शब्द आहे. स्वेरीतील एज्युकेशन हिच स्वेरीची खरी ओळख आहे. विद्यार्थ्यांनी चार वर्ष अपार कष्ट करून पुढचे चाळीस वर्ष सुखाने आपले करिअर करावे' असे सांगून संशोधनाचे महत्व सांगितले. अध्यक्ष स्थानावरून बोलताना अजित गटे यांनी विद्यार्थ्यांना उद्योजकतेविषयी विशेष मार्गदर्शन केले.

'ऑलम्पस २ के २५'च्या निमित्ताने देशाच्या विविध भागातील विद्यार्थी स्वेरी कॅम्पसमध्ये उपस्थित राहून विविध प्रकल्पांच्या सादरीकरणाची तयारी करत होते. या निमित्ताने स्वेरीच्या सर्व विभागांत अत्याधुनिक प्रकल्प, मशीन्स, ब्रीज, बांधकामाचे नमुने यांच्या प्रतिकृती तयार करण्यात आल्या होत्या. हे प्रदर्शन पाहण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी, स्पर्धकांनी प्रचंड गर्दी केली होती. पाहुण्यांनी देखील विविध प्रकल्पांना भेट देवून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे कौतुक केले.

यावेळी संस्थेचे माजी अध्यक्ष व जेष्ठ विश्वस्त दादासाहेब रोंगे, माजी अध्यक्ष व विश्वस्त एन.एस.कागदे, विश्वस्त बी.डी. रोंगे, सचिव डॉ. सुरज रोंगे, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतिश मांडवे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, स्वेरीच्या माजी विद्यार्थी संघटनेचे पदाधिकारी गुरुप्रसाद तेलकर, दत्ता घोडके, अभिजित नवले, 'ऑलम्पस २ के २५' चे समन्वयक प्रा. डी.टी.काशीद, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. तृप्ती चलवाड, प्रणाली नाळे, मयुरी मोरे व प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर ऑलंपसच्या सह सचिवा गिरीजा देशमुख यांनी आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अतिवृष्टीने झालेल्या नुकसानाची पाहणी करून प्रशासनाने पंचनामे त्वरित करण्याचे आदेश

## पालकमंत्री यांनी नुकसानग्रस्त शेतकरी व ग्रामस्थांशी संवाद साधला व राज्य शासन या आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांच्या पूर्णपणे पाठीशी असल्याची ग्वाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : जिल्ह्याच्या दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यात अनुक्रमे २ व सर्वच १० महसुली मंडळात अतिवृष्टी झाली. त्यामुळे अनेक गावातील शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे तसेच गावांना जोडणाऱ्या रस्त्यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. आज पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तुर, तोगराळी व कुंभारी तसेच अक्कलकोट तालुक्यातील सांगवी, शिरशी, बोरगाव, बादोले, रामपूर, साफळे, व किणी या गावांना भेटी देऊन प्रत्यक्ष नुकसानीचे पाहणी केली. प्रशासनाने नुकसानीचे पंचनामे तात्काळ करावेत व त्याबाबतचा अहवाल शासनाला त्वरित सादर करण्याचे निर्देशही यावेळी त्यांनी दिले.



यावेळी शेतकरी, नागरिक यांच्याशी संवाद साधून त्यांना धीर दिला व अशा आपत्तीच्या काळात राज्य शासन पूर्णपणे आपल्या पाठीशी असल्याची ग्वाही पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली. तसेच शासनाकडून लवकरात लवकर मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे सांगितले.

प्रारंभी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तुर येथील पाण्याने वाहून गेलेल्या रस्त्याची पाहणी केली. तसेच जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीच्या अनुषंगाने माहिती देऊन दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यात झालेल्या शेती पिकांचे रस्त्यांचे व अन्य बाबींच्या नुकसानीची माहिती पालकमंत्री महोदय यांना दिली.

यावेळी आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, प्रांताधिकारी सुमित शिंदे, तहसीलदार किरण जमदाडे, तहसीलदार विनायक मगर यांच्यासह सर्व संबंधित गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# नदी पात्रातून अवैध वाळू उपसा व वाहतूक थांबवा! – चंद्रकांत खरात यांची राज्याचे महसूल मंत्र्यांकडे मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/ बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी :

पर्यावरणाचा समतोल धोक्यात – शेतीचे नुकसान – पोलिस व प्रशासनाला सतर्क राहण्याचे निर्देश – जनजागृती आणि दंडात्मक कारवाईची जोरदार मागणी देऊळगाव राजा बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा आणि महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये नदी पात्रातून होत असलेला अवैध वाळू उपसा व वाहतूक ही गंभीर समस्या बनली आहे. पर्यावरणाचा समतोल बिघडत असून शेतकऱ्यांच्या शेतीला मोठा धोका निर्माण होत असल्याने महाराष्ट्र शासन युवा सामाजिक पुरस्कार प्राप्त चंद्रकांत खरात यांनी महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या निवेदन पाठवून तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.सदर पत्रात त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, अवैध वाळू उपशामुळे नद्यांचे पात्र बदलून पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे, जलस्रोत नष्ट होत आहेत आणि शेतीला अपार नुकसान पोहोचत आहे. यामुळे गावांमध्ये अराजक निर्माण होत असून गुन्हेगारीचे प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शासन आणि प्रशासनावर ठोस मागण्या

लोक आयुक्तांच्या निर्देशांनुसार राज्य शासनाने नदीपात्रातून वाळू उपसा करण्यास कठोर बंदी घालावी.

अवैध वाळू वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व संबंधित महसूल , पोलिस, परिवहन जलसंपदा विभागांनी समन्वयाने कार्य करावे.पोलिस विभागाने पेट्रोलिंग वाढवून सतर्क राहावे व अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी.

परिवहन विभागाने नंबर नसलेल्या वाहनांवर नियंत्रण ठेवून त्यांना मुळ मालकाकडे परत पाठवावे. संबंधित अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी पार पाडून शासनाच्या निर्देशांचे पालन करावे.जनजागृती मोहिमा राबवून अवैध वाळू उपशापासून लोकांना दूर ठेवण्याची भूमिका स्वीकारावी.

पर्यावरण आणि शेतीवरील गंभीर परिणाम

**अवैध वाळू उपशामुळे:**

नदी पात्र बदलून शेतीचे नुकसान, जलस्रोतांचे नाश, पर्यावरणाचा समतोल बिघडणे गावांमध्ये अराजक आणि गुन्हेगारी वाढणे

चंद्रकांत खरात यांनी यावर उपाय म्हणून पर्यावरण संतुलन राखण्यासाठी शासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. सहकार्य आणि जनजागृतीचे आवाहन

चंद्रकांत खरात यांनी नागरिकांनाही सजग राहण्याचे आवाहन करत पुढे म्हटले आहे :

पर्यावरण आणि शेती वाचवण्यासाठी प्रशासनास सहकार्य करा. अवैध वाळू उपशास मदत न करता त्याविरोधात आवाज उठा. नद्यांचे रक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

ते महाराष्ट्र शासन सामाजिक युवा पुरस्कार प्राप्त असून जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य आहेत.

**प्रशासनासाठी निर्देश**

अवैध वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांची यादी तयार करून सार्वजनिक करावी.

दंडात्मक कारवाई करून चुकीचे वर्तन थांबवावे.

महसुलाची हानी टाळण्यासाठी दक्षतेने काम करावे.

पर्यावरणीय नुकसान टाळण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करावी.

लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थांसह सहकार्य वाढवावे.

पर्यावरणाचे रक्षण आणि शेती वाचवण्यासाठी तातडीने कारवाई करणे अत्यावश्यक आहे. शासन, प्रशासन आणि समाज या सर्वांनी एकत्र येऊन नदी पात्रातील अवैध वाळू उपशावर अंकुश ठेवला नाही तर भविष्यात मोठ्या संकटाला सामोरे जावे लागेल, असे चंद्रकांत खरात यांनी स्पष्ट केले आहे.

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई पहिलं नंतर पंचनामा रिपाइंची पालकमंत्र्याकडे मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून ढगफुटी सदृश्य पाऊस झाला असून तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. मुसळधार पावसामुळे शेतांना तळ्याचे स्वरूप आलेले आहे. शेतातील संपूर्ण पीक पाण्याखाली गेले आहे त्यामुळे संपूर्ण पीक पाण्यामुळे कुजलेले आहे. या अतिवृष्टीमुळे ज्या ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहेत त्यांना तात्काळ भरपाई द्यावी व नंतर पंचनामा करावा व तसेच ज्या शेतकऱ्यांचे जनावरे पावसामुळे वाहून गेले आहेत व पावसामुळे ज्या शेतकऱ्यांचे विहिरी माती पडून बुजल्या आहेत व काही शेतकऱ्यांच्या शेताचे बांध वाहून गेले आहेत अशा शेतकऱ्यांचा वेगळा पंचनामा करून त्यांना लवकरात लवकर नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी रिपाइंचे तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी सोलापूर चे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या कडे केली. यावेळी आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी , रिपाइंचे शहर अध्यक्ष अजय मुकणार उपस्थित होते.

# निफाड येथील वैनतेय विद्यालयात माता–पिता स्मृतिदिनाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : निफाड येथील न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाच्या वतीने शनिवार दि २० सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता वैनतेय विद्यालयात ४१ व्या माता पिता स्मृति दिनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि.दा. व्यवहारे व विश्वस्त मंडळाने दिली.

विद्यालयाच्या सर्वांगीण विकासात अनेकदा त्यांनी भरीव योगदान देऊन सहकार्य केलेल्या असून संस्थेच्या वतीने त्या मान्यवर दात्यांच्या श्रद्धेय माता–पित्यांची पूजन पितृपक्षात दरवर्षी केले जात असून याही वर्षी या माता पिता स्मृती दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, याप्रसंगी भाजपा अध्यात्मिक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष ह .भ .प आचार्य तुषार भोसले यांचे व्याख्यान संपन्न होणार असून याप्रसंगी कृतज्ञता सोहळा व कक्ष नामकरण कार्यक्रम संपन्न होणार आहे.

याप्रसंगी पालक ,नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे

# निफाड युवक काँग्रेसच्या वतीने मोदींचा वाढदिवस बेरोजगार दिन म्हणून साजरा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मोदी सरकारच्या काळात वर्षाला तरुणांना दोन कोटी रोजगार देऊ हे आश्वासन पंतप्रधानांनी तरुणांना दिले. या अकरा वर्षात २२ कोटी रोजगार देणे तरुणांना अपेक्षित असताना ते दोन कोटी ही रोजगार देऊ शकले नाही याउलट चुकीची नोटबंदी, चुकीची जीएसटी, शेतकऱ्यांचे काळे कायदे,यामुळे देशाला महासत्ता घडवण्याची स्वप्न धुळीस मिळाली आहे.मोदी सरकारच्या काळात मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया,स्किल इंडिया, यासारख्या अनेक घोषणा झाल्या त्याच्या जाहिराती झाल्या पण अजूनही ८३% युवकांच्या हाताला काम नाही. तसेच ग्रामीण आणि शहरी भागात युवकांच्या व महिलांची बेरोजगारीची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. शिक्षित तरुणांचे पात्रतेनुसार नोकऱ्या मिळत नसल्याचे आकडेवारीवरून दिसून आले आहे. मोदी सरकारला या घटनेचे स्मरण करून देण्यासाठी निफाड युवक काँग्रेसच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस राष्ट्रीय बेरोजगार दिन म्हणून नाशिक जिल्हा ग्रामीण युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गौरव पानगव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली व निफाड विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष सचिन खडताळे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. याप्रसंगी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विनायक शिंदे, नंदकिशोर कापसे शहराध्यक्ष स्वप्नील बिनायकिया, तालुका सरचिटणीस सुहास सुरळीकर, तालुका उपाध्यक्ष अली भाई शेख, प्रभाकर हुजबंध, संपत कराड, कारिमखा पठाण, शहर उपाध्यक्ष अमीन कुरेशी,मनोज निरभवणे, सतीश भालेराव, दुर्योधन गांगुर्डे, रवी आहेर,भगवान झोंडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धम्म काया मिशन बौद्ध धर्म संमेलन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बदलापूर प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे :

बदलापूर – धम्म काया मिशन बौद्ध धर्म सम्मेलन बदलापूर या ठिकाणी १४ सप्टेंबर २०२५ रोजी हे संमेलन संपन्न झाला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे माननीय अरविंद सोनटक्के (आय आर एस)

प्रमुख मार्गदर्शक उपासक ड प्रवीण. रा .पंडित उपासक भिमराव घनसावंत, (अध्यक्ष धम्म काया मिशन) उपासक .उपासक प्रकाश मोरे (केंद्रीय सदस्य धम्म काया मिशन), विशेष सत्कार मा.सुभाष मोरे ( पी.एस.आय), प्रमुख उपस्थिती मा सचिन गायकवाड. मा.माधुरी भालेराव मा. संजय बागुल मा.प्रवीण गायकवाड मा.जगदीश गायकवाड. मा .नारायण लोंढे उपा.मा शीतल सावळे मा. माधुरी घोडके मा. अनिता वाटुंबरे मा.मंगला जाधव मा.प्रज्ञा पवार मा.ड सुरज पंडित मा.ड धीरज बनसोडे मा. ड पंकज अडकाळे मा.सुमित भालेराव. मा .बि के गायकवाड मा राकेश गरुड मा.रमेश घनगाव मा.महेंद्र कांबळे मा.अमोल जगताप मा.गणेश कांबळे डॉ मा.वड्डीकर मा.दादासाहेब दुपटे मा.प्रदीप अढगळे मा.दिलीप पवार मा.भाऊसाहेब बच्छाव.





स्वागत अध्यक्ष उपाध्यक्ष मनोज सावळे (ठाणे जिल्हा अध्यक्ष) सूत्रसंचालन मा.वैशालीताई महाजन विशेष आभार मा.अर्चनाताई अहिरे यांनी मांडले तसे या कार्यक्रमाला आलेल्या मान्यवरांनी बौद्ध धर्म सम्मेलन मध्ये बौद्ध धर्माबाबत परिपूर्ण माहिती देऊन बौद्ध धर्म कसा भारतामध्ये आहे त्या संदर्भात तसे इतर देशांमध्ये आपल्या बौद्ध धर्माची कशी जतन केली जाते यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

**विविध क्षेत्रात चांगले काम करणाऱ्या २१ मान्यवरांचा सन्मान**

**‘श्री परमेश्वर महाराज की जय’, 'हर हर महादेव', 'रक्ष रक्ष परमेश्वर' चा जयघोष**

# वागदरी परमेश्वराच्या पर्व पालखी महोत्सवात आंबील घागरींनी वेधले लक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील वागदरी येथे 'श्री परमेश्वर महाराजकी जय', 'हर हर महादेव', 'रक्ष रक्ष परमेश्वर' या घोषणांमधून, तालुक्यातील वागदरीच्या ग्रामदैवत परमेश्वर पर्व 'पालखी महोत्सव' साजरा करण्यासाठी काढलेल्या आंबिली घागरींचे मिरवणूकीने लक्ष वेधले.





गुरुवारी दुपारी १२ वाजता हनुमान मंदिरापासून परमेश्वर मंदिरापर्यंत गावातील महिलांनी काढलेल्या आंबिली घागरींची मिरवणुकीने लक्ष वेधले. मिरवणुकीच्या मध्यभागी, अफजलपुर तालुक्यातील हिरेजेवरगी शांताली गेश्वरा हिरेमठ येथील गुरु शांताली गराध्या महस्वामिजी आणि वागदरी विरक्त मठाचे शिवलिंगेश्वर महास्वामीजी यांना एका खुल्या वाहनातून मिरवणूक काढण्यात आले. नंतर, मंदिराच्या प्रांगणात झालेल्या प्रवचनात, पूज्यांनी प्रसादाचे महत्त्व सांगितले, की माणसाने नेहमीच सात्त्विक अन्न म्हणजेच प्रसाद सेवन करावे. प्रसादामुळे माणसामध्ये सात्त्विक गुण येतात. मांस व शिळे अन्न खाल्ल्याने नेहमीच तमो गुण म्हणजेच आसुरी वृत्ती येतो त्यांनी सर्वांना उत्सवादरम्यान बनवलेला प्रसाद खाण्याचे आणि चांगले गुण विकसित करण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, उत्तरा नक्षत्रावर परमेश्वर पंच समितीने आयोजित केलेला उत्सव विशेष आहे. उत्सवादरम्यान अन्न आणि ज्ञान हा मुख्य आधार असल्याने, गावात समृद्धी येते. वागादरीचे शिवलिंगेश्वर श्री उपस्थित होते.

सकाळी गावातील महिलांनी आंबिली घागर सजवून ते डोक्यावर वाहून गावाच्या मध्यभागी असलेल्या हनुमान मंदिरात जमले. तेथून ते गावाच्या मुख्य रस्त्यांवरून मिरवणुकीत काढण्यात आले५०० हून अधिक महिला सहभागी झाल्या. मिरवणूक मंदिरात पोहोचताच प्रसाद कार्यक्रम सुरू झाले आणि त्यानंतर प्रवचन कार्यक्रम झाला.

यावेळी वागदरी गावातील विविध विभागांमध्ये काम केलेल्या आणि विविध क्षेत्रात चांगले काम करणाऱ्या २१ मान्यवरांचा सन्मान करण्यात आले

गौडगाव संगीत कलाबलगाचे शिवरुद्रय्य स्वामी, वीरूपाक्षय्य स्वामी, बसवराज अळंद, सुरेश अळंद यांनी संगीत कार्यक्रमात तू मधुर कन्नड मराठी गायन केले. त्यांनी वचने, लोकगीते, भावगीते आणि तात्वपद गायले आणि प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

रात्री शिव भजन, भारुड, गिगी पदा, पारिजात भजन आणि गोंधळी नाटक यासारख्या कार्यक्रमांनी लोकांना मंत्रमुग्ध केले. दिवसभर आलेल्या भाविकांनी गव्हाच्या हुगी, ज्वारीची खिचडी आणि आंबील महाप्रसादाचा स्वीकार केला. पंचकामिटीच्या सदस्यांनी रात्री पाच दिवसांचा उपवास सोडला आणि गावातील सर्व कुटुंबियांसह मंदिरामध्ये एकत्रित प्रसाद केले.

उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी, शुक्रवारी, सोलापूर आळंद तोंटदार्य अनुभव मंडपातील कोरणे श्वर महास्वामीजींच्या हस्ते पालखी पूजेनंतर पालखी मिरवणूक निघेल. मिरवणुकीत अनेक कला मंडळे सहभागी होतील.

अक्कलकोटाचे, माजी आमदार सिद्धराम म्हेत्रे, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, सागर कल्याणशेट्टी , माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे आणि इतर अनेक मान्यवरांनी महोत्सवात सहभागी होऊन प्रसाद घेतला.

परमेश्वरा आराधना पर्व समितीचे नूतन अध्यक्ष राजकुमार निंबाळे, अशोक पोमाजी, गुड्डप्पा भरमदे, अमृत निंबाळे, घळय्या स्वामी, धोंडप्पा यमाजी,शरणप्पा मंगाणे, शिवानंद गोगाव, चंद्रकांत कणसे, श्रीशैल ठोंबरे, विजय निंबाळे, शांतेश्वर कोटे, परमेश्वर यमाजी परमेश्वर पोमाजी, आदी उपस्थित होते. सलागरे, साताप्पा पोमाजी, श्रीमंत सलागरे, मल्लिनाथ ठोंबरे, सिद्धराम कोटे, काशिनाथ कलशेट्टी, सिद्धराम बंगरगी, आदींनी पर्व यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# अतिवृष्टी झालेल्या ठिकाणचे प्रशासनाने पंचनामे अधिक गतीने करून अहवाल शासनाला सादर करावा : पालकमंत्री जयकुमार गोरे

## ज्या ठिकाणी ६५ मिलिमीटर पेक्षा जास्त पाऊस झालेला आहे, अशा ठिकाणचे १०० टक्के पंचनामे करावेत, यात कोणत्याही प्रकारची तडजोड चालणार नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**■ यापूर्वी जवळपास सर्व शेतकऱ्यांची ई-केवायसी झालेली आहे, पुन्हा ई-केवायसी साठी पंचनामे अहवाल थांबवू नका**

**■ प्रत्येक शासकीय यंत्रणांनी परस्परात समन्वय ठेवून पंचनामे पूर्ण करून शेतकऱ्यांना लवकर मदत मिळण्यासाठी प्रयत्न करावेत**

**■ सोलापूर महापालिकेने शहरात झालेल्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ पूर्ण करावेत व पुन्हा अशा अडचणी येणार नाहीत यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना सुचवाव्यात**




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून सातत्याने पाऊस पडत असून, ९१ महसुली मंडळापैकी ४३ महसुली मंडळात अतिवृष्टी झालेली आहे. तसेच उजनी व सीना नदी मधून पाणी सोडल्याने अनेक गावांमध्ये पूर परिस्थिती निर्माण होऊन शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे, घरांचे तसेच गावांना जोडणाऱ्या रस्त्यांचेही नुकसान झालेले आहे. तरी प्रशासकीय यंत्रणांनी नुकसानीचे पंचनामे अत्यंत गतिमान पद्धतीने तसेच ६५ मिलिमीटर पेक्षा जास्त पाऊस पडलेला ठिकाणचे १०० टक्के पंचनामे करून त्याचा सविस्तर अहवाल शासनाला सादर करावा, असे निर्देश राज्याचे ग्राम विकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीबाबतच्या आढावा बैठकीत पालकमंत्री श्री. गोरे बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सुनील कुंभार, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता सकृत खांडेकर, यांच्यासह प्रांताधिकारी व सर्व संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. गोरे पुढे म्हणाले की, जिल्ह्यात अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे शेती पिकांचे व नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. प्रशासकीय यंत्रणेने त्वरित पंचनामे करावेत. एकही शेतकरी व नागरिक पंचनाम्यापासून वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. ज्या ठिकाणी ६५ मिलिमीटर पेक्षा जास्त पाऊस झालेला आहे, अशा ठिकाणचे सरसकट पंचनामे करावेत, यामध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड चालणार नाही. अशा ठिकाणचे पंचनामे राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रांताधिकारी यांची राहील, असेही त्यांनी निर्देशित केले.

तसेच पंचनामे करत असताना शेतकऱ्यांची पुन्हा ई केवायसी करण्याची आवश्यकता नाही, यापूर्वीच प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेसाठी तसेच अन्य शासकीय योजनांसाठी शेतकऱ्यांचे ई- केवायसी झालेली आहे. त्याच बँक खात्यावर शेतकऱ्यांना थेट नुकसान भरपाईची रक्कम मिळेल यासाठी तहसीलदार व प्रांताधिकारी यांनी दक्षता घ्यावी. ई-केवायसी अभावी पंचनामेचा अहवाल पाठवण्यास दिरंगाई करू नये, असे पालकमंत्री श्री. गोरे यांनी सुचित केले. तसेच सर्व शासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदेचा बांधकाम विभाग यांनी त्यांच्या अधिनस्त रस्त्याच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करावेत. यंत्रणांनी जे शक्य आहे ते लवकरात लवकर करून शेतकऱ्यांना शासनाकडून लवकर मदत मिळण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सुचित केले.

सोलापूर शहरात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण करावेत. तसेच शहरात अतिवृष्टीमुळे अनेक भागातील नागरिकांच्या घरात पाणी जाऊन जे नुकसान झाले अशी परिस्थिती पुन्हा उद्भवणार नाही या दृष्टीने सर्व कारणांचा सविस्तर शोध घ्यावा व त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना सुचवाव्यात असेही निर्देश पालकमंत्री गोरे यांनी महापालिका यंत्रणेला दिले.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अतिवृष्टीने व पुरामुळे जिल्ह्यात झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने प्रशासकीय यंत्रणेकडून सुरू असलेल्या पंचनामे च माहिती दिली. तसेच सर्व स्थानिक प्रशासकीय यंत्रणेला वेगाने पंचनामे करून त्वरित अहवाल सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले असल्याची माहिती दिली. महापालिका आयुक्त श्री. ओंबासे यांनी शहरात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या घरांचे पंचनामे करण्याची कार्यवाही पूर्ण होत आल्याचे सांगून या अनुषंगाने कायमस्वरूपी उपाययोजनाबाबतही सविस्तर प्रस्ताव लवकरच दिला जाईल, असे सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.जंगम यांनी जिल्ह्याच्या ग्रामीण भागात अतिवृष्टीने झालेल्या रस्ते, शासकीय इमारती, शाळा इमारत याबाबतचे पंचनामे करून अहवाल लवकरच सादर केला जाईल असे सांगितले.

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी माहे जून ते आज रोजी पर्यंत वार्षिक सरासरीच्या ९५.९५ टक्के पाऊस झाल्याची माहिती दिली. तसेच एक ते १८ सप्टेंबर २०२५ या कालावधीत ९१ महसुली मंडळापैकी ४३ महसुली मंडळात ६५ मिलिमीटर पेक्षा अधिक म्हणजेच अतिवृष्टी झाल्याचे सांगून ४४८ गावे बाधित झाल्याचे त्यांनी सांगितले. या कालावधीत करमाळा तालुक्यातील श्रीमती शांताबाई वाघ या मयत झालेल्या होत्या, त्यांच्या नातेवाईक यांच्या थेट बँक खात्यात शासकीय मदत जमा केल्याचेही त्यांनी सांगितले.

तसेच यामध्ये मयत जनावरे २८, मयत कोंबड्या १५ हजार २५ तर २७६ घरांची परझड तर मिळालेल्या प्राथमिक अहवालानुसार बाधित शेतकऱ्यांची संख्या १ लाख ८६ हजार इतकी असून अतिवृष्टी व पुरामुळे ३ हजार ४३४ नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याने नुकसान झाल्याची माहिती श्री. पाटील यांनी यावेळी दिली.

यावेळी महसूल चे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच गटविकास अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# विठ्ठल परिवाराने उभारलेल्या संस्था त्यांच्या वारसांनी मोडीत काढल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विठ्ठल परिवारातील ज्येष्ठ नेत्यांनी पंढरपूर तालुक्यातील ऊस गाळप व्हा यासाठी साखर कारखाने व गुळ कारखाने, उभे केले मात्र त्यांच्या वारसांनी. संस्था मोडीत काढण्याची काम केले आहे. शेतकऱ्यांनी गणेश पाटील यांच्या घरासमोर आम्हाला पैसे द्या अशी मागणी केली आहे. त्यामुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.



विठ्ठल कारखान्यातील ज्येष्ठ नेत्यांनी विठ्ठल सहकारी साखर कारखाना, सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखाना, कृषिराज ऍग्रो फूड गुळ कारखाना उभे केले आहेत. या माध्यमातून पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांचा ऊस गाळप करून त्यांना रक्कम दिली जात होती. मात्र गेल्या काही वर्षापासून विठ्ठल परिवारातील वारसा असलेली सहकार शिरोमणीची चेअरमन कल्याणराव काळे, यांनी कारखाना भाडेतत्त्वावर देणार असल्याची चर्चा होत असल्याने, शेतकरी सभासदांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. हा कारखाना भाडेतत्त्वावर दिला जाऊ नये यासाठी शेतकऱ्यांनी न्यायालयीन लढाई सुरू करण्यात आली आहे.

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना स्वर्गीय भारत नाना भालके यांनी चांगल्या प्रकारे चालवला मात्र या कारखान्याकडे त्यांचे सुपुत्र भगीरथ भालके यांनी दुर्लक्ष केले असल्यामुळे. या कारखान्याचे गळीत हंगाम काही दिवस बंद होते. त्यामुळे पंढरपूर तालुक्यातील शेतकरी आर्थिक अडचणीत आला होता.

गेले सहा महिन्यापासून बगळीत बालके नॉट रिचेबल आहे. गायब आहेत. विठ्ठल परिवारातील नेत्यांनी कृष्णा अग्रो गूळ कारखाना उभा केला आहे. या कारखान्याची चेअरमन गणेश पाटील यांनी गेले तीन वर्ष उसाची बिले दिले नाही. त्यामुळे संतप्त झालेले शेतकऱ्यांनी भोसरी येथील गणेश पाटील यांच्या घरासमोर आंदोलन केले.

यावेळी गणेश पाटील यांनी आंदोलनाची भेट घेऊन कारखाना हा आर्थिक अडचणीत असल्यामुळे ऊस बिल देण्यात विलंब होत आहे. तरी लवकरात लवकर तुमचे वीज बिल देण्यात येईल असे आश्वासन देण्यात येईल. विठ्ठल परिवारातील नेत्यांनी साखर कारखाने व गूळ कारखाने उभे केले पण वारसांनी हे कारखाने दबगायला आणल्याचे दिसून आले आहे.

# आदर्श गणेशोत्सव मंडळ म्हणून जय जवान गणेशोत्सव मंडळाचा प्रथम क्रमांक मंगळवेढा पोलीस स्टेशनच्या वतीने सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळा पोलीस स्टेशनच्या वतीने घेण्यात आलेल्या आदर्श गणेशोत्सव मंडळ निवड स्पर्धेत जय जवान गणेशोत्सव मंडळाने प्रथम क्रमांक पटकावला उत्सवातील शिस्तबद्ध नियोजन, व सामाजिक उपक्रमातील सभा, डॉल्बी मुक्त व पर्यावरण पूरक पद्धतीने साजरा केलेला गणेशोत्सव या सर्व गोष्टींचा विचार करून मंडळाचा सन्मान करण्यात आला. मंगळा पोलीस उपयोगी अधिकारी डॉक्टर बसवराज शिवपुजे व पोलीस निरीक्षक दत्तात्रेय बोरी गिड्डे यांच्या हस्ते देण्यात आला, याप्रसंगी पोलीस प्रशासनाच्या वतीने मंडळाला सर्वांचे पत्र देऊन गौरवण्यात आले. मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी हा सन्मान स्वीकारत



आगामी काळात सामाजिक बांधिलकी जपत गणेश उत्सव आणि आदर्शवत पद्धतीने साजरा करण्याचा संकल्प केला. यावर्षी मंडळाच्या वतीने सामाजिक उपक्रम अंतर्गत आरोग्य शिबिर रक्तदान शिबिर मातोश्री वृद्धाश्रम गोपाळपूर येथे अन्नदान, ये घर एक झाड स्मशानभूमीतील गाईज पशुखाद्य व चारा दान उपक्रम राबवण्यात आले, तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाची भजन व्याख्यान प्रबोधनात्मक सोंगी भारुड कीर्तने, होम मिनिस्टर हा कार्यक्रम घेण्यात आली तसेच डीजे मुक्त मिरवणूक काढण्यात आली यामध्ये पारंपारिक लेझीम दिंडी सनई या वाद्यात मिरवणूक काढण्यात आली यावेळी मंडळाचे अध्यक्ष अरुण गंगे उपाध्यक्ष विजय दत्तू, गणेश दत्तू, अक्षय हेंबाडे, निखिल कस गावडे, प्रथमेश गुंगे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बीड जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांचा झाला सन्मान

# गरजा कमी ठेवा; स्वाभिमानाने जगा : ना.पंकजाताई मुंडे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बीड(प्रतिनिधी)संतभगवानबाबांनी एक्कर विका पण शाळा शिका असा संदेश दिला होता. आजच्या युगामध्ये शिक्षण तर महत्वाचे आहेच. परंतु या पिढीतील विद्यार्थ्यांना‘ गरजा कमी ठेवा आणि स्वाभिमानाने जगा ’ असा संदेश देण्याची गरज आहे. परिस्थितीशी समझोता करा परंतु तत्वाशी तडजोड कधीच करु नका.आपल्याकडे कमी पैसे आहेत याची खंत वाटण्यापेक्षा आपल्याकडे जास्त संस्कार आहेत याचा अभिमान वाटू द्या असा मौलिक सल्ला राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धनमंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी दिला.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाशी समरस व्हायला शिकवले तर त्यांना शिस्तीचे वेगळे धडे देण्याची आवश्यकताच पडणार नाही.प्रत्येक आदर्श नागरिक घडवण्यामध्ये शालेय जीवनातील शिक्षकांची भूमिका खुप महत्वाची असते असेही ना.मुंडे यांनी सांगितले. बीड जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने शिक्षण क्षेत्रात योगदान देणार्या मान्यवरांच्या सत्कार समारंभात त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे हे होते. तर महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष ना.समीर काझी,भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख,भाजपा नेते संतोष हांगे,बीड जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष आदित्य सारडा, जेष्ठ नेते नवनाथ शिराळे, अल्पसंख्यांक आघाडीचे नेते सलीम जहाँगीर, शहराध्यक्ष अशोक लोढा, संपादक वैभव स्वामी, संपादक बालाजी तोंडे यांचीही विशेष उपस्थिती होती.

पत्रकार संघाच्या वतीने कला, क्रीडा, संगीत, नाट्य, संस्कृत, वेद, मदरसा, वक्तृत्व, प्रशासन, बुद्धिबळ, कौशल्य विकास, योग प्रशिक्षण, अबॅकस, आश्रमशाळा, मतीमंद शाळा आणि सीबीएससी, इंग्रजी शाळा यासह आदर्श शिक्षणसंस्था, आदर्श शाळा, आदर्श शिक्षक पतसंस्था, सामाजिक सहभागातून विकसित झालेली शाळा अशा वैविध्यपुर्ण शैक्षणिक पुरस्कारांचे वितरण पंकजाताईंच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमात बोलतांना ना.पंकजाताई म्हणाल्या की, माझेही शालेय शिक्षण परळीमध्ये झाले.पहिलीच्या वर्गात असताना विद्यार्थ्यांना फरशीवर बसावे लागायचे. हे पाहिल्यानंतर स्व.मुंडे साहेबांनी आमच्या शाळेतील सर्व वर्गात मुलांना बसण्यासाठी आसन पट्ट्यांची व्यवस्था केली होती याची आठवण ताईंनी सांगितली.जीवनामध्ये कितीही मोठ्या पदापर्यंत गेले तरी मी माझ्या शालेय जीवनातील शिक्षकांना कधीही विसरु शकणार नाही. कारण त्यांनीच खर्या अर्थाने माझा पाया भक्कम केला असल्याचे ताई म्हणाल्या. घरात रा.स्व. संघाचे विचार असल्यामुळे आई-वडिलांनी शक्य असतानाही इंग्रजी शाळेत न पाठवता जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत आम्हा तीनही बहिणींना प्रवेश दिला होता.संत भगवानबाबांनी एक्कर विका पण शाळा शिका हा संदेश त्या काळात दिला. माझे आजोबा, मामा, मावशी,काका हे सर्वजण शिक्षक होते. त्यामुळे शिक्षणाचे महत्व आजोळच्या वंश परंपरेने आपोआप कळाले होते.आता काळ खुप बदलला आहे. शिक्षण क्षेत्रातील स्पर्धा पराकोटीची वाढली आहे. साधन सुविधांना नको तेव्हढे महत्व आले आहे. अशा वेळी सधन असणे आणि समृध्द असणे यातला मुलभूत फरक आजच्या पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी समजून घेण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादित केली.आई-वडिलांनी चांगल्या किंमतीचा मोबाईल घेवून दिला नाही म्हणून आत्महत्ये सारखे पाऊल उचलणारे मुलं पाहिल्यानंतर मन व्यथित होते.आपल्याकडे एक वेळ पैसा कमी असला तरी चालेल परंतु संस्काराचे धन मात्र खुप असले पाहिजे.सधन असण्यापेक्षा समृध्द असण्याचा अभिमान वाटला पाहिजे असे पंकजाताईंनी सांगितले.मुलांना खरोखर शिस्तीचे धडे द्यायचे असतील तर त्यांना पर्यावरणाशी समरस व्हायला शिकवा असेही त्यांना आवर्जुन सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बीड जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी केले.तर प्रास्ताविक संयोजन समितीचे अध्यक्ष नितीन क्षीरसागर यांनी केले.

### बुलेट पॉईंट

**■१७ सप्टेंबर रोजी बीडमध्ये रेल्वेचे लोकार्पण झाले.हा श्रेयवादाचा विषय नसून ही आमची स्वप्नपुर्ती आहे असे पंकजाताई म्हणाल्या.**

**स्व.मुंडे साहेबांच्या मागणीवरुन स्व.विलासराव देशमुख यांनी या रेल्वे मार्गासाठी ५० टक्के खर्च राज्य शासनाने करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु जेव्हा या दोघांचेही निधन झाले तेव्हा मात्र बीडच्या रेल्वेचे आता काय होणार? असा प्रश्न पडला होता. नरेंद्र मोदी यांनी बीड येथे जाहिर सभेत स्व.मुंडे साहेबांचे स्वप्न साकार करण्यासाठी बीडला रेल्वे आणू असे जाहिर अभिवचन दिले होते. ते त्यांनी पुर्ण केले असे ताई म्हणाल्या.**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही पंकजाताईंनी बीड रेल्वेचे श्रेय दिले.**

**■ ज्या ठिकाणी स्त्रीचे अस्तित्व असते तिथे कारभार चांगला चालतो अशी विशेष टिप्पणी ताईंनी आपल्या भाषणात केली. ग्रामविकास मंत्री असताना दिड लाख शिक्षकांच्या बदल्या ऑनलाईन पध्दतीने त्यांच्या सोयीच्या ठिकाणी केल्या. बीडच्या कार्यक्रमात अशा बदल्या झालेले अनेक शिक्षक ताईंचे आभार मानण्यासाठी आले होते.※सरकार आम्हाला पगार देते,बंगला देते. तरी सुध्दा बदल्यांसाठी पैसे घेतलेच नाही पाहिजे. म्हणूनच ज्या ज्यावेळी मी मंत्री झाले त्या त्या वेळी पारदर्शक बदल्यांचा प्रयोग केल्याचे ताई म्हणाल्या.※मधल्या काळात बीड जिल्ह्याची अक्षम्य अशी बदनामी झाली. वास्तविक आमचा हा बीड जिल्हा खुप चांगला आहे. भलेही आमच्या विकासाला उशिर झाला. कारण आम्ही स्वातंत्र्यानंतरही अनेक वर्ष निजामाच्या राज्यात होतो.जो भाग ब्रिटिशांच्या ताब्यात होता त्या ठिकाणी विकास अगोदर पोहचला. आता उशिरा का होईना रस्ते आणि रेल्वेच्या माध्यमातून बीड जिल्हा समृध्द होत असल्याचे ताईंनी सांगितले.※बीड जिल्हा पत्रकार संघाच्या शिक्षक पुरस्कार वितरणाला पुढच्या वर्षी सुध्दा मी नक्की येणार आहे आणि हा कार्यक्रम आणखी चांगल्या पध्दतीने आपण घेवू अशा शब्दात ताईंनी संघाच्या पदाधिकार्यांचे कौतुक केले.**

**दुनिया को जीतने का हौसला रखो**

**तूफान मे ताश का घर नही बनता । रोने से बिगडा मुक्कदर नही सुधरता।। दुनिया को जीतने का हौसला रखो। एक हार से कोई फकीर औरएक जीत से कोई सिकन्दर नही बनता ।।**

**या शायरीने आपल्या भाषणाची सुरुवात करत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांनी सर्व पुरस्कारार्थींचे अभिनंदन केले. आपल्या भाषणात ते म्हणाले की, कलागुणांची पारख करण्यासाठी आपल्या जीवनात चांगला शिक्षक मिळावा लागतो आणि तो जर मिळाला तर जन्माचे सोने व्हायला वेळ लागत नाही. अहमदनगर जिल्ह्यातील पाचवीच्या वर्गात शिकणार्या एका मुलाने गीत गायले, शिक्षकाने त्याचा व्हिडिओ तयार करुन प्रसिध्द केला. तो पाहून प्रसिध्द संगितकार अजय -अतुल यांनी त्या मुलाला संधी दिली.हे केवळ त्या शिक्षकामुळे घडू शकले. आज ज्यावेळी केंद्र आणि राज्याच्या स्पर्धा परिक्षांचे निकाल लागतात तेव्हा ग्रामीण भागातून आलेली मुलं मोठ मोठ्या पदावर निवडले जात आहेत. याचा अर्थ बुध्दीमत्ता ही आता मर्यादित राहिली नसून त्याचे सामर्थ्य सर्वदुर पोहचले आहे. त्यासाठी फक्त जिंकण्याची जिद्द असली पाहिजे.आणि ही जिद्द मुलांमध्ये निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षकांची असल्याचे मुंडे म्हणाले.**

### यांचा झाला सन्मान

**गणेश मैड, मारुती पठाडे,संतोष दाणी, सौ.रचना सचिन जाधवर, सुशील उचले ,दत्तात्रय क्षीरसागर,वेदमूर्ती अमोलशास्त्री जोशी, गंगाधर देशमुख , सौ.दीप्ती देशमुख, राधा तांबे,धर्मनाथ शिंदे, कल्पना मुंडे,सौ.शीतल काळदाते, प्रा.दिनकर प्रभाकर थोरात,मौलाना अब्दुल हादी ,डॉ. अशोक सखाराम घोडके , सुशील दिनेशराव पवार,अंजली खोबरे,प्रा.भालचंद्र देशमुख,दिलीप मुरलीधर कुलकर्णी,सौ. ज्ञानेश्वरी पवन घाडगे,सौ. श्रद्धा पिंगळे (धांडे),सौ.मैथिली मिरगणे,सौ. दक्ष दयाराम वानखेडे,बाळासाहेब कळसाने, अमर रामचंद्र पुरी,प्रा.बिभीषण चाटे,,देविदास डोळे,शरद शेजाळ,लक्ष्मीकांत दोडके,गिरीश भावले,सुनील फुलचंद मुंडे यांना पुरस्कार देवून गौरविण्यात आले.**